| | |
|---|---|
| | रेग्युलर दिवाणी दावा क्रमांक ५१/२०१९.<br>पंडीत ईश्वरा शिंदे,<br>विरुध्द<br>श्री. कृष्णात बाु दरेकर,वगैरे |

# निशाणी २८ खालील आदेश

यातील वादी यांनी सदरच्या अर्जामध्ये दिवाणी प्रक्रिया संहिता कलम ६ नियम १७ प्रमाणे दावे मध्ये दुरुस्ती करणेकरिता विनंती केली आहे.

२. वादीचे असे कथन आहे की, दावा दाखल करतेसमयी नजरचुकीने दावा कलम १ मध्ये पान क्र. ३ वरुन ओळ क्रमांक ६ व १६ मध्ये " संपुर्ण गट क्रमांक पैकी वादीचे मालकीचे क्षेत्र हे.०१.३८.८ आर " अशी टंकलेखन चुक झालेली आहे, परंतू त्याठिकाणी " क्षेत्र हे.०.७२.०० आर " अशी अर्जात नमुद केलेप्रमाणे दुरुस्ती होणे आवश्यक आहे. सबब वादीने सदरची दुरुस्ती होवून मिळणेबाबत विनंती केली आहे.

३. प्रतिवादीने सदर अर्जास त्याच अर्जावर म्हणणे दाखल करुन विरोध दर्शवुन वादी यांनी सदरचा अर्ज दावा प्रलंबीत ठेवणेसाठी दिला आहे सबब योग्य ते आदेश पारीत करावेत असे सांगीतले आहे.

४. अर्ज व दाव्याचे अवलोकन केले. प्रस्तुतचा दावा वादी यांनी प्रतिवादी यांचेविरुध्द कायम मनाई ताकीद होवून मिळणेकरीता दाखल केलेला आहे. प्रस्तुत दुरुस्तीद्वारे वादीने दाव्यामध्ये दावा कलम १ मध्ये पान क्र. ३ वरुन ओळ क्रमांक ६ व १६ मध्ये " संपुर्ण गट क्रमांक पैकी वादीचे मालकीचे क्षेत्र हे.०१.३८.८ आर " ऐवजी " क्षेत्र हे.०.७२.०० आर " असा अर्जात नमुद केलेप्रमाणेचा मजकूर नमुद करु इच्छीतात. प्रस्तुत दाव्या वादीने पुरावा देणेवर प्रलंबीत आहे. सबब दाव्याची संपरिक्षा सुरु झालेली नाही. दिवाणी प्रक्रिया संहिता आदेश ६ नियम १७ प्रमाणे दुरुस्ती करणेबाबत दोन परिस्थितींचा विचार करणेत आलेला आहे. जर दावा दुरुस्ती संपरिक्षापुर्व असेल तर न्यायालयाने असा अर्ज मान्य करावा असे नमुद आहे. जर दावा दुरुस्ती संपरिक्षा चालू झालेनंतर प्रस्तावित

असेल तर न्यायालय अशी दुरुस्ती मंजूर करु शकते परंतू दुरुस्ती मागणा-या पक्षकाराला यापुर्वी दुरुस्ती का मागीतली नाही याबाबत योग्य ते कारण न्यायालयास दाखवावे लागते. वर नमुद केलेप्रमाणे प्रस्तुत प्रकरणात संपरिक्षा चालू झालेली नाही. त्यामुळे प्रस्तुत दुरुस्ती नाकारणे म्हणजे अत्यंत तांत्रीक व पांडीत्यपुर्ण (Pedantic) दृष्टीकोन ठेवल्यासारखे होईल. प्रस्तुत प्रकरणात अद्याप वादीने पुरावा दिलेला नाही. त्यामुळे वादी मागतात त्याप्रमाणे दुरुस्ती केल्यास दाव्याचे स्वरुप बदलणार नाही. सबब वादीची प्रस्तावीत दावा दुरुस्ती न्यायोचीत व संयुक्तीक ठरते. सबब अर्ज मंजूर करणे योग्य आहे. सबब, खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

**<u>आ दे श</u>**

०१. अर्ज मंजूर करणेत येत आहे.

०२. वादीने अर्जात मागणी केलेप्रमाणे दाव्यामध्ये कलम १ दुरुस्तीची मागणी आजपासून चौदा दिवसात करावी व दावा दुरुस्त प्रत त्वरीत दाखल करावी.

Digitally signed by MANE VAISHNAVI ROHAN
Date: 2025.03.04 12:44:50 +0530

दिनांक ०३.०३.२०२५.

श्रीमती व्ही.आर.माने,
दिवाणी न्यायाधीश क.स्तर,पन्हाळा.